**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.५/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. १४७ दिनांक २७/०३/२००८

***विषय*** : महावितरण कंपनीत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांनी वैयक्तिक कामासाठी राजकीय पक्षाकडून किंवा तिऱ्हाईत व्यक्तीकडून दबाव आणणेबाबत.

***संदर्भ*** : १) परिपत्रक क्र.साप्रवि/रवका/४९ दिनांक २८.११.१९७४
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.२१७ दिनांक ०७.०४.१९९७
३) प्रशासकीय परिपत्रक क्र.२६ दिनांक १४.०३.२००६

......

महावितरण कंपनीतील काही कर्मचारी त्यांची नियुक्ती, पदोन्नती, बदली इत्यादी व यासारख्या इतर वैयक्तिक कामाकरिता आमदार, खासदार, राजकीय पक्ष, लोकप्रतिनिधी, शासनाचे अधिकारी अथवा इतर वरिष्ठांमार्फत शिफारसींचा प्रयत्न करतात असे निदर्शनास आले आहे.

२. वैयक्तिक कामासाठी कर्मचाऱ्यांनी केलेली सदर कृती ही संदर्भिय परिपत्रकान्वये वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन न करणे व म.रा.वि.मंडळ कर्मचारी सेवा विनियमातील तरतुदींचा भंग करणारी आहे. या अनुषंगाने संबंधित कर्मचाऱ्याविरूध्द शिस्तभंग कारवाई करण्याबाबत व त्यांच्या सेवापुस्तिकेत आणि गोपनीय अहवालात तशा नोंदी करण्याच्या सूचना संदर्भिय परिपत्रकान्वये यापूर्वी वेळोवेळी देण्यात आल्या आहेत.

३. सबब, महावितरण कंपनीतील सर्व कर्मचाऱ्यांना पुन्हा एकदा सूचीत करण्यात येते की, वैयक्तिक कामासाठी उदाहरणार्थ पदोन्नती, बदली इत्यादी कामांकरिता वरिष्ठ अधिकाऱ्यांवर राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार, शासनाचे अधिकारी अथवा इतर वरिष्ठांमार्फत कोणत्याही प्रकारे शिफारस आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल शिवाय त्यांच्या सेवापुस्तिकेत व गोपनीय अहवालात तशी नोंद केली जाईल.

४. सर्व सक्षम अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की या विषयी दिलेल्या सूचना त्यांच्या अखत्यारितील सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व त्यांचे काटेकोरपणे पालन होईल याबाबत खबरदारी घ्यावी. तसेच असे प्रकरण निदर्शनास आल्यास संबंधित कर्मचाऱ्याविरूध्द वरील दिलेल्या सूचनेप्रमाणे तथा सेवाविनियमातील तरतुदी अन्वये शिस्तभंग कार्यवाही करावी. शिवाय याबाबत त्यांच्या सेवापुस्तिकेत व गोपनीय अहवालात तशी नोंद घ्यावी.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक म.रा.वि. वितरण कं. मर्यादितच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

*(कर्नल राहुल गोवर्धन)*
*कार्यकारी संचालक (मासं)*

प्रत,
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे उपविभागीय कार्यालयाचे स्तरापर्यंत.

*K/Adm.Cir.F.N.5*